# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/१२/२०२५ ( बुधवार )**

---

## पर्यावरणास अपायकारक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजाची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद ३४ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त

**पोस्टे कळमेश्वरः—** दिनांक ०८/१२/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा गोंडखैरी, व्हि.आर.एल. लॉजीस्टिक यार्ड येथे कंटेनर क्रमांक जी जे २१ वाय ३३१८ यामध्ये प्रतिबंधीत नायलॉन मांजाची वाहतूक होत असुन सदरचे कंटेनर हे अनलोडींग करीता व्हि.आर.एल. लॉजीस्टिक, गोंडखैरी येथे उभे आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कळमेश्वर पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले आणि उभ्या असलेल्या कंटेनर क्रमांक जी जे २१ वाय ३३१८ ची पंचासमक्ष तपासणी केली असता नमुद कंटेनर मध्ये बॉक्स मध्ये नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीमध्ये गुंडाळलेले मिळुन आले. आरोपीचे ताब्यातून एकुण १२०० नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्री किंमती १४,४०,०००/— रूपये तसेच कंटेनर किंमती २०,००,०००/— रूपये असा एकुण ३४,४०,०००/— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे. चालकाचे नाव विचारले असता **आरोपी चालक नामे छविनाथ मोहन निशाद, वय ३० वर्ष, रा. विंध्याचल गाव, बसई कालन, राजापुर, जि. मिर्झापुर, राज्य उत्तर प्रदेश** अशी माहीती प्राप्त झाली. त्याला नायलॉन मांझा कोठुन आणला याबाबत विचारना केली असता त्याने सांगितले की, नमुद प्रतिबंधीत नायलॉन मांजा हा सुरत, गुजरात येथुन लोड करून आणलेला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वरला कलम १२५, २२३ भा.न्या. सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



## अवैध्यरित्या बिबटयाचे कातडे आणि वन्यप्राण्यांचे अवशेष घरात ठेवणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

## बुट्टीबोरी पोलीस आणि वनविभाग यांची संयुक्त कारवाई

दिनांक ०९/१२/२०२५ रोजी वनविभागाला माहीती प्राप्त झाली की, बुटीबोरी पोलीस स्टेशन हद्दीत काही इसमांनी अवैध्यरित्या वन्यप्राण्यांचे अवशेष घरात ठेवले आहे. वनविभागचे अधिकारी यांनी सदर माहीती बुटीबोरी पोलीस स्टेशन येथे दिली. माहीती परिपुर्ण नसल्याने बुटीबोरी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी आणि पोहवा/२१८८ रमेश नागरे यांनी वनविभाग चे अधिकारी /अंमलदार यांच्यासह जावुन सदर आरोपीतांचा गुप्त बातमीदारांच्या मदतीने शोध घेतला असता आरोपी मौजा रिधोरा, शिरूळ येथून आरोपी अमित ज्ञानेश्वर येणुरकर रा. रिधोरा, शिरूळ, ता. हिंगणा याचे घरून वन्य प्रान्याचे अवशेष तसेच मौजा बुटीबोरी येथील ग्यानाजी पांडुरंग खिल्लारे याचे घरून बिबटयाचे कातडे मिळून आले. पुढील कारवाई साठी नमुद आरोपीतांना वनविभाच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## पत्नीच्या खुनाचा प्रयत्न करणाऱ्या पाहीजे आरोपीस भिवापूर पोलीसांनी २४ तााासाच्या आत केले अटक

**पोलीस स्टेशन भिवापूर :—** फिर्यादी नामे सौ. काजल राजु मारबते, वय २३ वर्ष, रा. पांजरेपार पुनर्वसन ता. भिवापुर जि. नागपुर यांनी पोलीस स्टेशन भिवापूर येथे तोंडी रिपोर्ट दिली की, पिडीता आचल व **आरोपी नामे साहील रमेश रूईकर, रा.मांढळ ता.कुही जि. नागपुर** हे पती पत्नी असुन त्यांचेमध्ये चारिऱ्याचे संशयावरून वादविवाद सुरू होते. त्याचे जाचाला कंटाळुन पिडीता ही फिर्यादी यांचे घरी राहत होती. दिनांक ०८/१२/२०२५ रोजी पिडीता ही घरी हजर असता आरोपी हा आला व आरोपीने पत्नीच्या चारीऱ्यावर संशय घेवुन व तिला शिवीगाळी व वादविवाद करून चाकुने वार करून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला. अशा रिपोर्ट वरून कलम १०९ भा. न्या. सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद आरोपी हा गुन्हा केल्यापासुन मिळुन येत नव्हता. भिवापूर पोलीस यांनी तांत्रिक पुरावे आणि गुप्त बातमीदाराच्या मार्फतीने आरोपीचा शोध घेत अवघ्या २४ तासाच्या आत आरोपीचा शोध घेवुन त्याला दिनांक ०९/१२/२०२५ रोजी भंडारा जिल्हयातील मुरमाडी,येथून ताब्यात घेतले. **नमुद आरोपीला अटक आहे.**

## खापा पोलीस स्टेशन येथील अभिलेखावरील गुन्हेगार हर्षल प्रदीप मोहटे याला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये उपविभागिय दंडाधिकारी सावनेर यांनी पोलीस स्टेशन खापा अभिलेखावरिल आरोपी हर्षल प्रदीप मोहटे, वय २३ वर्ष, रा. डोंगेघाट खापा, ता. सावनेर जि. नागपूर याला नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

नमुद आरोपी याचेवर लोकांना मारपीट करणे, दंगा करणे, जबरीने हिसकावुन घेणे, जिवाने मारण्याची धमकी देणे यासारखे गंभीर गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी हा गुन्हे करण्याच्या सवयीचे असल्याने तो अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात

दहशत पसरवितात तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ), (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव खापा पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून नमुद आरोपी हर्षल प्रदीप मोहटे, वय २३ वर्ष, रा. डोंगेघाट खापा, ता. सावनेर जि. नागपूर यांस १ महिन्यांकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला माहीती दयावी.**



**आरोपी हर्षल प्रदीप मोहटे**

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक
# केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ०९/१२/२०२५ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, एक महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम. पी. —२८/ए.डी.—०५६० या वाहनाने पोस्टे केळवद हद्दीतील कवठा शिवारातील नाल्यातून अवैधरीत्या विनापरवाना रेती भरून येत आहे. अशा मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा केळवद येथील कवठा फाटयाजवळ नाकाबंदी केली असता एक महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर मिळुन आला. महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम पी २८ ए डी ०५६० यास थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे अभय गोविंदा सरोदे, वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र. ०५, तेली मोहल्ला केळवद ता. सावनेर जि. नागपूर याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. घटनास्थळाहुन पोलीसांनी पंचासमक्ष १) महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम पी २८ ए डी ०५६० किंमती ३,००,०००/—रू. तसेच त्या ट्रॅक्टरला विना नंबर नसलेली ट्रॉली किंमती १,००,०००/—रू. २) १ ब्रास रेती किंमती ६०००/— रूपये ३) एक ॲडरॉइड मोबाईल किंमती १०,०००/—रू. असा एकुण ४,१६,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद आरोपी वाहन चालक अभय गोविंदा सरोदे, वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र. ०५, तेली मोहल्ला केळवद ता. सावनेर जि. नागपूर याच्या विरूध्द पोस्टे केळवद येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं २०२३, सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी चालक अभय गोविंदा सरोदे यास अटक करण्यात आली आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०६ गुन्हे नोंद

दिनांक ०९/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ३८१५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन उमरेड येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे एकुण ०३ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ०६ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ७०० मिली विदेशी दारु, ९०० मिली देशी दारु, २० लीटर मोहाफुल दारू असा एकुण ३,८१५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने